म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वाङ्मय
दा. क्र. १२४५४
नोंद क्र. १२४५४
३४७२
IRBK-0112454




ग. ग्रं. सं.
विषय

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे,
तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार
प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

# हरितालिका

अर्थात्

# पार्वतीस्वयंवर

म. ग्रं. सं. ठाणे.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
आ. क्र. १२४५४ नों. दि. ..........
वि. ........ क्र. ..........

IRBK-0112454

किंमत ८ आणे.

प्रकाशकः—
गो. वा. कुलकर्णी,
महाराष्ट्र ग्रंथ भांडार,
कोल्हापूर.

( सर्व हक्क प्रकाशकांच्या स्वाधीन )

मुद्रकः—
जयराम दिपाजी देसाई
राष्ट्रवैभव प्रेस, गिरगांव,
मुंबई ४.

ग्रं. सं.

# हरितालिका.

"कां? कमल, इंदु, मोकळ्याच कशाला आलांत? पाटी पुस्तकं कुठं आहेत?" बाई म्हणाल्या.

इंदु म्हणाली" बाई, आज हरतालिकेचा उपास आहे नं? मग नुसती हजेरी घेऊन सोडून देतां ना? सुटी नाहीं का बाई आम्हाला!"

"अं हं सुटी नाहीं. होती पूर्वीं, पण हल्लीं कमी झाली."

"कां बाई कमी झाली? खरं म्हणजे पाहिजे नाहीं का बाई आज सुटी?"

"हो खरं ग; पण हल्लीं दुसऱ्या राष्ट्रीय सुट्या वाढल्या ना? त्यामुळं ह्या सुट्या कमी झाल्या."

"कां बाई?"

"मागं म्हणजे ह्या १५।२० वर्षांआधीं देशांत अगदीं शांतता—स्मशान—शांतता होती का म्हणानात! त्या वेळीं आतां सारखी राष्ट्रीय जागृति बिलकुल झाली नव्हती. मग अशा वेळीं असलेले चार धार्मिक सण व चार व्रतं इतक्याच सुट्या असायच्या. आतां सण म्हणजे तरी फार दिवसांपूर्वीं झालेल्या राष्ट्रीय घडामोडींची खूण किंवा आठवण म्हणूनच प्रचारांत आलेला दिवस ही गोष्ट खरी आहे, पण हें फार थोड्यांना माहित आहे. आपले लोक आंधळी परंपरा मानणारे किंवा 'असं चालत आलंय तर तसं करायचं' असं म्हणणारे असल्यामुळं, त्याला

रूढीचं रूप आलं आणि सध्यां तरी रूढी म्हणजेच धर्म होऊन बसलाय् म्हणून त्याला धार्मिक सण म्हणतात. हरितालिकेच्या व्रताचीहि सुटी होती व ती फक्त मुलींच्या शाळांनाच असायची. पण ती बंद झाली ह्या राष्ट्रीय सुट्या आल्यामुळं! बरं, तें जाऊं दे. पण काय ग, उपास कुणाकुणाचा आहे?" बाई म्हणाल्या.

"डेझी, ल्युसी आणि गुलशन, ताहेरा, साकेरा यांचा तेवढा नाहीं, बाकी सगळ्यांचा आहे. बाई, हिंदु म्हणून जेवढ्या आहेत ना तेवढ्या सगळ्यांचा उपास आहे, बाई."

"होय का? पण का ग, उपास कशासाठीं करतां?"

"आम्हांला नाहीं बाई ठाऊक!"

"अँ! तुम्हाला नाहीं बाई ठाऊक! मग कुणाला ठाऊक? कार्यकारण भाव समजल्याशिवाय कोणतीहि गोष्ट करूं नये असं मी नेहमीं तुम्हाला सांगतें त्याचा असाच उपयोग करतां वाटतं? कारण माहीत नसतांना कोणतीहि गोष्ट करूं नये, मग ती किती का क्षुल्लक असेना. आंधळ्यासारखं वागणं म्हणतात त्याला! सांगा पाहूं, कां उपास करतात हा? अन्नांत बदल म्हणून? का एखादे दिवशीं पोटाला विश्रांति म्हणून? का एखादं व्रत म्हणून?"

"'व्रत' म्हणून बाई," इंदू म्हणाली.

"होय का! कसलं व्रत आहे तें? आणि कशासाठीं करायचं? का वर्गानं आज मुक्याचं व्रत घेतलंय् कीं काय माझ्या? का ग, बोलत कां नाहींत? अँ? इतका अबोल कधीं पासून झाला

वर्ग माझा? ताराबाईंचा वर्ग म्हणजे हजर जबाबी वर्ग असं म्हणतात सगळीं; ते खोटं बोलतात सगळे! नाहीं? त्यांना सांगितलं पाहिजे या पुढं कीं, ताराबाईंचा वर्ग म्हणजे मुका वर्ग असं म्हणा म्हणून."

"कां बाई, आमचा वर्ग कां म्हणून मुका होईल? आमचा नाहीं मुका वर्ग!"

"मग सांगा ना कशासाठीं करतां उपास?"

"अं हं! तुम्हीच सांगा."

"मी काय सांगूं? उपास करणार तुम्ही, आणि कारण सांगणार मी होय?"

"बाई, आई करायला सांगते म्हणून आम्ही करतों!"

"होय का? किती आज्ञाधारक माझ्या मुली! पण अभ्यासाच्या बाबतींतच तेवढी माझी अन् आईची आज्ञा मानायची नाहीं असं ठरवलंय् वाटतं? काय हो आज्ञाधारक, आणखी कोणकोणत्या बाबींत आणि किती दिवसपर्यंत असं आंधळं आज्ञाधारक राहायचं ठरवलंय तुम्ही?"

"तसं नाहीं बाई. आई उपास करते; ती कर म्हणाली म्हणून करतें. त्याला कारणहि आहेच कीं."

"सांग ना मग—"

"अं...चांगला नवरा मिळावा म्हणून!"

" चांगला नवरा मिळावा म्हणून, का मनासारखा मिळावा म्हणून ? "

" मला नाहीं माहित ! "

" कां माहित नाहीं ? कथा वाचली नाहींस का तूं ? "

" अं हं ! "

" कां ? "

" आईनं पूजा घेतली आहे. ती पहाटेसच नदीला जाऊन अंग धुवून येते. येतांना नदीकांठची वाळू, फुलं, पत्री, घेऊन येते. हरितालिकेच्या बाहुल्या कालच विकत आणून ठेवल्या आहेत. आज भटजीबुवा येतील. पूजा सांगतील. मग कथा सांगून जातील. आम्हाला गणपतीची तयारी करावयाची असते. आम्ही मुली नुसतं हळद कुंकु तेवढं घालतों नी जातों. मुलींनीं फक्त उपासच करायचा असतो, आई म्हणाली. म्हणून आम्ही तसंच करतों ! "

" फार छान करतां ! असं करूं नये आंधळ्यासारखं ! कामाच्या गडबडीसाठीं आई म्हणाली असेल. शिवाय पूजेचं व्रत घेऊं नको म्हटलं म्हणून का कथेकडं लक्ष देऊं नको म्हटलं वाटतं ? हातांनीं काम करतां करतां कथेकडं लक्ष देणं कांहीं इतकसं अवघड नाहीं ! बायकांना तशी संवय केलीच पाहिजे. हातांनीं काम करायचं घरांतलं पण कान आणि डोळे उघडे ठेऊन जगांतल्या गोष्टी ऐकायच्या आणि पाहायच्या !

असलं कसल वागणं आंधळ्या बहिऱ्या सारखं ? असल्या नाहींत मुली मला आवडत ! काय होणार अशा मुलींच्या हातून ?"

" बाई, तुम्हीच सांगाना ती गोष्ट आम्हांला. "

"होय तर ? गृहशिक्षण, समाजशिक्षण आणि शालेय शिक्षण या सर्वच गोष्टी मी बघते की ! म्हणजे नेमलेला अभ्यास संपण्याची आशाच नको ! तरी पण बहुतेक सगळं मी घेतेच. कारण मला माहीत आहे कीं, तूर्त गृहशिक्षण जितकं समाधानकारक रीतीनं मिळायला पाहिजे तितकं मिळत नाहीं, आणि म्हणून त्यावर अवलंबून आपल्याला राहतां येणार नाहीं ! पण मला याचं आश्चर्य वाटतं कीं, तुम्ही मुली, त्यांतल्या त्यांत माझ्या मुली, अशा कशा ? कीर्तन किंवा कथा चुकविणं म्हणजे फॅशन झाली आहे. तसं करूं नका. तें सगळं ऐकायचं आणि मग शंका आली तर विचारायचं. पण ही चुकारतट्टुपणाची फॅशन् सोडून द्या. "

" नाहीं बाइ, आम्ही नाहीं करणार यापुढं तसं ! पण आज गोष्ट सांगतांना ? सांगा ना बाई हरितालिकेची गोष्ट. "

" बरं. सांगते आतां पुरती ! डेझी, ल्युसी, ताहेरा, साकेरा, तुम्ही पण ऐका. तुम्हांला पण आवडेल. छान आहे गोष्ट. तुमची परवां ऐकलेली लैलामजनूनची तुमच्या पुराणांतली गोष्ट परवांच्या तुमच्या मौलूदमध्यें सांगितली ना ? तशा प्रकारची पण थोडी वेगळी अशी एका अत्यंत दृढनिश्चयी अशा मुलीची गोष्ट आहे. तिनं आपल्या मनानं जें एकदां ठरवलं तें वाटेल तें

करून तडीला नेलं. ती मुळींच भ्याली नाहीं! असं कसं करूं असं तिला वाटलं नाहीं! कारण तिची श्रद्धा, तिची भक्ति, तिची निष्ठा अढळ होती. तिचं प्रेम अचल होतं, आणि आपलं प्रीति-दैवत आपल्यासाठीं धांवून येईल, याची तिला खात्री होती. म्हणून तिनं हें व्रत स्वीकारलं होतं. आतां तुम्हीच पाहा कीं, कोणत्याहि गोष्टीवर साधक बाधक विचार करून निकाल घेण्याची तिची ताकद होती म्हणजे तिनं किती अभ्यास केला असला पाहिजे? तिनं किती विचार केला असला पाहिजे? तिनं किती तपश्चर्या केली असली पाहिजे? आणि तें केल्यावरच मग आपल्या प्रेमासाठीं, निष्ठेसाठीं आणि भक्तीसाठीं तिनं आपल्या आई-बापांच्या विरुद्ध बंड केलं. तिच्या त्या निष्ठेप्रमाणं तिचं दैवतहि धांवून आलं. तिच्या त्यागाचं सार्थक झालं.

अशी ती मुलगी म्हणजे पार्वती होय. पार्वतीपरमेश्वराची दिव्य कथा आहे ती! जगांतली पहिली प्रेमकथा म्हणतात तिला!

आपल्या हिंदुस्थानच्या उत्तर दिशेला हिमालयाच्या आस-पासच्या प्रदेशावर व त्या पर्वतावर हिमवान् या नांवाचा एक राजा राज्य करीत होता. हिमवान्‌च्या राज्यांतलीं पर्वताची शिखरं सदा बर्फानं म्हणजेच हिमानं भरलेलीं असायचीं; म्हणून या पर्वताला आणि या पर्वतावर राज्य करणाऱ्या हिमवान्‌लाही लोक हिमालय असंच म्हणू लागले. हिम म्हणजे बर्फ आणि आलय म्हणजे घर ही शब्दाची फोड माहीतच आहे तुम्हांला!

तो राजा फारच दयाळू व प्रेमळ होता. आपल्या प्रजेचं पालन तो पोटच्या पोरांप्रमाणं करी. लोकांच्या सुखसोयी पाही. त्यांच्या अडीअडचणींचा विचार करी. त्यामुळं लोक सुखी होते. देवाचीहि त्याच्यावर कृपा होती. त्या पर्वतांतूनच गंगा, यमुना, सिंधु यांसारख्या मोठमोठ्या नद्या उगम पावल्या असल्यामुळं त्यांत पावसाळ्यांत पावसाचं आणि उन्हाळ्यांत बर्फाचं पाणी सदा भरलेलं असे. सुंदरशीं सरोवरं तुडुंब भरलेलीं असायचीं. त्यांत राजहंस पक्षी पोहायचे आणि सुरकांड्या मारीत असायचे! मोठमोठीं कमळं फुललेलीं असायचीं आणि त्यांच्यावर निळसर सोनेरी रंगाचे काळे भोर भुंगे सदा गुंगुं गुंगुं असं गाणं म्हणत या फुलावरनं त्या फुलावर फिरत असायचे! अनेक रंगाचे चित्रविचित्र पक्षी आकाशांतून भिरभिरत असायचे.

हिमवान्च्या राज्यांत अनेक तऱ्हेचीं झाडं नुसतीं गगनाला भिडलेलीं आणि किर्र अशीं लागलेलीं! अनेक तऱ्हेच्या फुलांचा तर नुसता खच पडलेला. मधमाशांचे थवेच्या थवे आणि मधाचीं पोळीं तर चारदोन झाडांच्यामध्यें एखादं तरी असायचंच! अनेक तऱ्हेचीं फळझाडं फळांच्या भारानं वाकलेलीं. कोणचं बघायचं आणि कोणचं खायचं? सगळी मजाच मजा!

इतक्यावरच संपलं नाहीं. पायथ्याला पिकंसुद्धां तितकींच चांगलीं होतीं. नदीकांठीं भरपूर दाणे असलेल्या हरभऱ्याचीं हिरवींगार रानंच्या रानं पसरलेलीं असत.

हिरव्यागार गव्हावर पोपटी सोनेरी लोंब्यांचे तुरे नजर ठरूं

देत नसत. वाऱ्याची झुळक आली कीं पाण्याची लाटच्या लाट आल्यासारखं वाटायचं !

मोहरी फुलली कीं सगळ्या रानांतनं केशराचा सडा टाकल्याचा भास व्हायचा !

जंगलांत पण तसंच ! " हिंदुस्तानी बोरांच्या " जाळ्या तर मुटक्यासारख्या बोरींनीं लवलेल्या असायच्या !

गाईगुरांचीं अनेक खिल्लारं चरत असायचीं. वासरांच्या उड्या आणि गमतीच्या टकरी सोडवतां सोडवतां गुराखी दमून जात असत !

त्यांना राखणारीं पोरं खांद्यावर बाण भाता, हातांत बांसरी घेऊन मजेंत फिरायचीं, पण डोळ्यानं अचुक सावज हेरायचं नी टिपून मारायचं आणि गाईला वांचवायचं, हा त्यांचा उद्योग.

शेतकी आणि गोपालन करणाऱ्यांची हिमवान् फारच काळजी घेई.

अशा या सुंदर व समृद्ध हिमालयावर हिमवान् राजाला एकुलती एक अशी मुलगी होती. ती अत्यंत रूपवान होती. अतिशय हुशार होती. ती त्याची फारच लाडकी होती. तरी पण त्यानं कधींच तिचे भलते लाड केले नाहींत आणि तिनंहि कधीं भलता हट्ट धरला नाहीं.

ती नेहमीं इतिहासपुराणांचं वाचन करी, अभ्यास करी. हिमवान् हासुद्धां विद्वान् असल्यानं त्याच्याकडे नेहमीं विद्वान लोकांची येजा असे. हिमालयांत तपश्चर्येसाठीं येणाऱ्या ऋषि-

मुनींची शक्यतों व्यवस्था व्हावी, त्यांची गैरसोय होऊं नय म्हणून तो स्वतः काळजी घेई. आणि त्याप्रमाणं त्याची सर्वांना ताकीद दिलेली असे.

अनेक तपस्वी राजाकडे येत. अनेक तऱ्हेचे वादविवाद होत. अनेक विषयांवर अनेक तऱ्हेनं चर्चा चाले. ती तें सर्व लक्षपूर्वक ऐकत असे. व त्या दोन्ही बाजू ऐकून घेऊन आपलं स्वतःचं मत बनवीत असे. तिला असंहि वाटूं लागलं कीं, आपणहि मोठी तपश्चर्या करावी. देवाला प्रसन्न करून घ्यावं. इतकंच नाहीं तर देवपदहि प्राप्त करून घ्यावं. मनुष्य जर प्रयत्न करील तर तो देवसुद्धां होऊं शकतो. म्हणच आहेना ? कीं, " नर करणी करे तो नरका नारायण बन जाय. " पूर्ण मनुष्य किंवा निर्दोष मनुष्य म्हणजेच देवपद, त्याच्याच लोक पायां पडतात. असं हें देवपद मिळवावं, आपल्यांत मोठी सहनशक्ति यावी, कष्ट करण्याची संवय व्हावी म्हणून ती तपश्चर्या करूं लागली.

प्रथम कांहीं दिवसपर्यंत तिनं खालीं मान घालून मौन व्रत स्वीकारलं.

नंतर कांहीं दिवस भर उन्हाळ्यांत चारी बाजूला अग्निहि पेटलेला आणि वर सूर्यनारायण तापलेला अशा रीतीनं पंचाग्नि-साधनहि तिनं केलं.

मग ऐन पावसाळ्यांत गळ्यापर्यंत पाण्यांत बुडून बसून तपश्चर्या केली.

कांहीं दिवस अन्नपाणी वर्ज केलं व सारखं ध्यान धारण करून मन शांत व निर्विकार करण्याचा प्रयत्न केला.

अशा रीतीनं तिनं आपली योग्यता वाढवून घेतली. लोक तिला देवी पार्वती म्हणूं लागले.

तिच्या वडिलांनीं व दुसऱ्याहि पुष्कळ मंडळींनीं तिला यापासून वळविण्याचा प्रयत्न केला, पण तिनं तें ऐकलं नाहीं. ती त्या निश्चयापासून दूर झाली नाहीं. कारण तो निश्चय विचारपूर्वक केलेला होता. विचारपूर्वक केलेल्या निश्चयापासून न ढळण्यांतच खरा मोठेपणा आहे. हिमवान्‌ला आपल्या मुलीचे ते कष्ट बघून फारच वाईट वाटे. त्या प्रेमळ आईबापांच्या आंतड्याला पीळ पडे. त्यांना वाटे, "असलं हें कन्यारत्न मला देवानं कशाला दिलं? माझी कुठं आहे योग्यता इतकी? आतां मी तें कुणाला देऊं? कुणाला शोभेल तें? योग्यच वर पाहिजे तिला! नाहींतर ह्या उग्र तपस्विनीचं आयुष्य फुकट नाहीं का जाणार? संसारानंतरच संन्यास घेतला पाहिजे! पण जर अयोग्य पतीच्या पदरांत पडली तर संसाराआधींच संन्यासाची तयारी करावी लागेल तिला!

कुठं वर शोधूं पति माझ्या कन्येला?"

अशा प्रकारं त्यांचे विचार चाललेले असत.

पण पार्वती नेहमीं आपल्या विचारांत, वाचनांत व विद्वान लोकांचे वादविवाद लक्षपूर्वक ऐकण्यांत गुंग असे.

"शिव शक्ति वाद" "शिव श्रेष्ठ कीं विष्णु श्रेष्ठ" इत्यादि वादविवाद ती ऐकत असे व हा वाद ऐकतां ऐकतां तिला बाकीचा वाद जरी कळला नाहीं तरी श्रीशिवशंकर तिला

आवडू लागले. त्यांच्या विषयीं वादविवाद ती लक्षपूर्वक ऐकूं लागली. शेवटीं तिला वाटलं, यांच्या कृपेला आपण पात्र व्हावं, यांचा सहवास आपल्याला लाभावा, यांचा सहवास आपल्याला घडावा.

हिमालयांतच अत्यंत उंच अशा धवल सुंदर शिखरावर–कैलास पर्वतावर–श्रीशिवशंकर रहात असत. हे अत्यंत विद्वान, अत्यंत कलावान्. होते. जगांतल्या साऱ्या कलांचा जन्मच त्यांच्यापासून झाला. नृत्यकलेचं तर आदिदैवत! अत्यंत सामर्थ्यवान् असून अत्यंत त्यागी! ज्यांना कसल्याहि सुखोपभोगाचा थोडाहि मोह नाहीं असे हे शंकर तिला फारच आवडूं लागले. सारखा ध्यासच लागला तिला. त्यांचं नांव 'शंकर' म्हणजे शुभ करणारा हें तर फारच आवडायचं तिला. सारखी जप करायची त्या नांवाचा! शेवटीं तिनं ठरवून टाकलं मनाशीं कीं, जर लग्न करायचंच झालं तर अशाच त्यागी देवाशीं, नाहींतर नाहीं! आणि हें एकदां निश्चित झाल्यानंतर ती त्यांना प्रसन्न करून घेण्यासाठीं हरतऱ्हेचे प्रयत्न करण्याच्या उद्योगाला लागली.

हें सगळं नारदांना माहित होतं. त्यांच्या भांडण लावून मजा बघण्याच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणं यांची मजा करायची त्यांनीं ठरवलं.

नारद एकदां हिमवान्कडे आले. त्यांना पाहून हिमवान्ला फारच आनंद झाला. त्यांचं उत्तम प्रकारें स्वागत करून षोडशो-

पचारें पूजा केली. कुशल प्रश्न विचारीत असतां पार्वतीच्या लग्नाचा विषय निघाला व तिला योग्य पति मिळण्याची आपली चिंता हिमवानांनीं व्यक्त केली. तेव्हां सर्व हकीकत ऐकून नारद म्हणाले, 'नगाधिराज, आपली हैमवतीसंबंधीची—पार्वतीसंबंधीची–चिंता रास्त आहे. त्या हेमांगीला वर पाहणं म्हणजे अत्यंत कठीण आहे तरी पण मला असं वाटतं कीं, त्या शुभांगी पार्वतीला माझ्या मतानं श्रीविष्णु हेच एक योग्य वर आहेत. जसा सर्व नक्षत्रांत चंद्र श्रेष्ठ व शीतल, सर्व नद्यांत गंगाच अधिक पवित्र व श्रेष्ठ, जसा सर्व इतिहासपुराणांत भारत श्रेष्ठ, सर्व इंद्रियांत मन श्रेष्ठ, तसाच सर्व देवांत श्रीविष्णु हे श्रेष्ठ आहेत. तरी आपण आपली सुयोग्य कन्या सुयोग्य वरासच द्यावी. दुसरीकडे–देणं म्हणजे उत्तम रत्नाचं अयोग्य ठिकाणीं दान केल्यासारखं होणार आहे. तरी आपल्या कन्यारत्नाचं दान श्रीविष्णूंनाच करावं हें उत्तम.'

'खरंच नारदमुनि, मला कल्पनाच नव्हती! ... पण श्रीवैकुंठेश्वर--विष्णु घेतील ना माझी कन्या पदरांत?'

'हो हो, मी जाऊन सांगतों ना निश्चित करून आलों म्हणून!'

'बरं तर मी घरांत सांगतों सर्वांना!'

'हो टाका सांगून सर्वांना! जातों मी. नारायण, नारायण!'

नारद ऋषी निघून गेले. नगाधिराज हिमवान् घरांत गेले. आपल्या पत्नीला हांक मारून म्हणाले, 'आपल्या लाडक्या कन्येची काळजी भगवत्कृपेनं झाली दूर!'

'काय, काय झालं ? कुठं वर निश्चित केला का ?'

'होय, प्रभू वैकुंठेश्वर श्रीविष्णू यांना वर नेमस्त केलें आहे.'

'अगबाई, खरंच कीं, काय ?'

'होय, नारद स्वामी गेले आहेत पाचारणासाठीं, काय होतंय पाहूं या ?'

'होय का? मग काय फारच छान ! सर्व देवांत श्रेष्ठ. रूपानं तरी किती सुंदर ! अगदीं सुरेख जोडी शोभते नाहीं ? माझ्या राजस बाळीला योग्य पती आहेत ते ! हें जर झालं तर आपली पार्वती भाग्यवान् खरी ! ती पण आहेच म्हणा तशी ! तिच्या इतकी सुंदर आणि तपस्विनी मुलगी जगांत तर नाहींच पण स्वर्गांतही मिळायची नाहीं ! पण वाटेल तें करून घडवून आणावंच हें.' पार्वतीची आई म्हणाली.

अशा प्रकारें चाललेलं आपल्या आईबापांचं बोलणं तिनं ऐकलं. त ऐकून तिला फारच वाईट वाटलं. शिवाय तिला वाटलं हेंहि तितकंच खरं कीं, जरी आपण त्यांना कितीहि सांगितलं तरी त्यांना आपलं सांगणं पटणार नाहीं व ते आपलं ऐकणार नाहींत. माझं न ऐकतांहि ते हें केल्याशिवाय राहणार नाहींत. कारण वास्तविक पाहतां तें माझ्या कल्याणाचंच आहे, त्यांच्या दृष्टीनं तें बरोबरहि आहे. पण तें माझ्या इच्छेविरुद्ध आहे. त्यामुळं मला तें सुखाचं होणार नाहीं. माझ्या मनाला त्रास होणारच ! आतां काय करूं ? कुठं जाऊं ? कुणाला विचारूं ? असं म्हणून ती बेचैन अवस्थेंत इकडे तिकडे फिरूं लागली.

तिचें कशांतच लक्ष लागेना! पुन्हां तिच्या मनांत विचार येऊं लागले.

‘ मी आजपर्यंत श्रीशंकराची भक्ति केली. त्यांचीच आराधना केली. त्यांनाच वरण्याचा निश्चय केला. मला तेच योग्य वर आहेत. तेहि तपस्वी, मीही तपस्वी, त्यांनाहि सुखोपभोगाची आवड नाहीं, मलाहि नाहीं! त्यांनाहि घरादाराचा मोह नाहीं मलाहि नाहीं. मीहि रानांत राहणारी तेहि रानांत राहणारे! मला ते व त्यांना मीच योग्य ! बाबा मला त्यांना न देतां जर विष्णूंनाच देणार असतील तर मी माझा प्राणच ठेवणार नाहीं. श्रीविष्णु चांगले आहेत. मला ते आवडतात पण ते बंधु म्हणून ! पति म्हणून नव्हे. जर लग्नच करायचं तर, तें शंकरांशींच करीन. पण आतां पुढं करूं तरी काय ?... हं आतां मैत्रिणीकडं जाते, सखीला विचारते. ती काय म्हणते तें पाहून मग काय तें ठरवते, असं म्हणून पार्वती आपल्या मैत्रिणीच्याकडे निघाली. तोंच गिरिराज हिमवान् तिच्याकडे आले व म्हणाले “ बाळ, तूं मोठी भाग्यवान् आहेस. तुझ्यासाठीं भगवान् विष्णु पति योजिला आहे. नारद तिथिनिश्चय करून येतील ! ”

पार्वती क..ाच बोलली नाहीं. आपल्या सखीच्या घरीं जातें असें आईला सांगून तिच्या घरीं गेली.

तिथें जातांच मत्रिणीला बाजूला बोलावून घेऊन तिच्या गळ्याला मिठी मारून रडूं लागली. मैत्रिणीला कांहींच कळेना. कांहींशी शांत झाल्यावर सखीनं विचारलं—

'पार्वती, अग तुला झालं तरी काय? कां रडतेस तूं? तुझ्या मनाला वाईट वाटण्यासारखं असं कांहीं झालं का? का कांहीं संकट आलं आहे तुझ्यावर? अगं पण तुझ्यासारख्या दृढनिश्चयी आणि हुशार मुलीवर येणारं हें संकट तरी कसलं आहे, हें तरी आम्हांला सांग! इतके कष्ट सोसणारी तूं आणि इतकी कशी घाबरली आहेस? सांग सांग ना, म्हणजे त्यांतून आपण मार्ग तरी काढूं! आम्हाला जितकी शक्य असेल तितकी मदत आम्ही तुला करूं याची मात्र खात्री ठेव. वेळेला जर उपयोग नाहीं तर मैत्रीण तरी काय कामाची! आणि हें तुला माहीत आहे ना कीं, शेवटीं मैत्रीणच उपयोगी पडते?'

'होय, म्हणूनच मी तुझ्याकडे आलें. आज माझ्या वडिलांनीं माझं लग्न श्रीविष्णूशीं ठरविलं आहे.'

'वा! मग काय, छानच!'

'अंहं, ते मला पसंत नाहींत.'

'म्हणजे? मग कोण पसंत आहेत?'

'भगवान् कैलासनाथ. श्रीशंकराच्याबरोबर विवाह करण्याची माझी इच्छा आहे! मी त्यांच्याशींच लग्न करणार. पण वडिलांनीं श्रीविष्णूंच्या बरोबर ठरवलंय!'

'फारच छान केलंय त्यांनीं! तेच योग्य आहेत तुला! त्यांचाशींच लग्न कर तूं!'

'अं हं, मी नाहीं कोणाशीं लग्न करणार! फक्त शंकराशींच जमलं तर करीन, नाहीं तर नाहीं करणार कोणाशींच!'

‘ तूं वेडी नाहींस, मग हें काय करतेस वेड्यासारखं ? विचारपूर्वक कोणताहि निश्चय करावा ! तूं तें एक; कर श्रीविष्णूशीं लग्न. ’

‘मी करणार नाहीं ! माझा एकदां निश्चय ठरला तो ठरला. मी कधींहि बदलणार नाहीं ! मग त्यासाठीं वाटेल तें होवो !’

‘ वेडी रे वेडी ! अग बघ तरी जरा विचार करून ! काय पण नवरा तरी शोधलास ! दोन्हींत तुलना केली तर ती तुलना सुद्धां होणार नाहीं. इतका असला विजोड नवरा काय म्हणून शोधलास तरी ? ’

‘बघ. श्रीविष्णु सुंदर, किरीटधारी, तर तुझं तें ध्यान श्रीशंकर, जटा बांधून बसलंय ! रूपानं अत्यंत सुंदर श्रीविष्णु; तर तुझ्या त्या शंकराचा तो भयानक अवतार पाहून पळून जावंसं वाटतं !’

‘श्रीविष्णुचे दांत म्हणजे रत्नाचे जणूं खडेच बसवलेत असं वाटतं; तर शंकराचे दांत भयंकरच !’

‘ श्रीविष्णुच्या गळ्यांत अनेक रत्नांच्या बहुमोल माला, कौस्तुभ मण्यांचा तेजस्वी हार तर तुझं तें ध्यान भयानक असे सापच गळ्याभोंवतीं गुंडाळून बसलंय ! कशी जवळ जाशील त्याच्या ? ’

‘श्रीविष्णुचे डोळे म्हणजे उमलतीं कमळं ! तर तुझ्या शंकराच्या डोळ्यांतून आगीच्या ठिणग्या बाहेर पडताहेत ! केव्हां जग जाळायला उठेल कुणी सांगावं ? ’

श्रीविष्णु चतुर्भुज तर शंकर दशभुज !

श्रीविष्णु सर्व जगाचा सांभाळ करणारा आणि श्रीवत्सलांछन भूषण म्हणून मिरवणारा! तर तुझा महादेव शंकर विद्वानांच्या मुंडमाळा गळ्यांत घालणारा! काय पण शोभा दिसत असेल ती तुझी तुलाच माहीत!

श्रीविष्णुंची पिवळा पितांबर चापून चोपून नेसलेली बांधेसूद आकृति किती शोभून दिसते नी तुझं तें सोंग एखादं वाघाचं नाहीं तर हत्तीचं कातडं अंगाभोवतीं गुंडाळून बसतं! काय पण दिसतं तरी!

श्रीविष्णूंचं वाहन पांढराशुभ्र दिगंतरांत उडणारा गरूड! काय मजा येत असेल आकाशांतून उडतांना त्याच्यावर बसून! पण तुझे हे पतिराज आणि तूं त्या म्हाताऱ्या बैलावरनं निघालांत कीं गांव गोळा होईल बघायला!

श्रीविष्णु शेषशायी! सापावर आंथरूण घालणारा नी झोपणारा. तर तुझा संन्यासी कुठल्या स्मशानांत कुठल्या चितेवर बसेल कुणास ठाऊक? जा तिथं मसणांत बसायला! फारच आनंद वाटेल तिथं तुला!

गंधर्वांच्या नाच गाण्यांत तल्लीन असणारे विष्णु कुठें, तर भुतांच्या किंचाळण्यांत सूर मिसळणारा नी आनंद मानणारा तुझा शंकर कुठें!

अनेक भोग व अनेक विलास भोगणारे श्रीभगवान् विष्णु सोडून तुला तो त्यागी संन्यासी हवा कशाला? मग लग्न तरी

कां करतेस तूं ? मला नाहीं कळत कीं, तुला हे असले शंकर कां आवडतात ? अजून तुला शंकर आवडतात ?'–सखी म्हणाली.

'होय, मला अजूनही शंकर आवडतात! आणि ते कां आवडतात हें तुला सांगून कळायचं नाहीं. मला सांगतांहि यायचं नाहीं. पण त्यांची योग्यता तूं जाणत नाहींस हें मात्र खरं. नाहीं तर तूं त्यांचं असं वर्णन केलं नसतंस! त्यांचं वर्णन बरोबर आहे आणि ते तसे कां आहेत आणि त्यांची योग्यता त्यावरूनच किती मोठी आहे हें मात्र मी सिद्ध करून देईन.'

'हो तर द्याल कीं आपण! प्रेम आंधळं असतं असं सांगणार आहांत का ? नाहीं तर कसं काय समर्थन करणार त्या भुताच्या अवताराचं ?'

'मी प्रेम आंधळं असतं असं सांगणार नाहीं. आणि माझं प्रेम आंधळं नाहींहि! चांगलं डोळस आहे तें! योग्यता पटल्या नंतरच ठरवलं मनाशीं!'

'थोडं थांब! ठरवण्यापूर्वी माझ्या म्हणण्याचा विचार कर अन् मग काय तें करू या. पण हें पाहिलंस ना, तुला लग्न करायच आहे! तुला मुलं बाळं व्हावयाचीं आहेत! आणि तूं जगत्पित्या विष्णुला सोडून–सर्व मनकामना पूर्ण करणाऱ्या विष्णूला सोडून–मदन जाळणाऱ्या अशा त्या रुक्ष संन्याशाबरोबर काय म्हणून करतेस लग्न ? तुझं भाग्य मोठं आहे. तुझं लग्न वैकुंठेश्वराशीं ठरलं आहे. तूं वैकुंठाची–स्वर्गाची राणी होशील. तर माझं ऐक राजकुमारी, असं अभिष्टासारखं

९२८५८ बोळे वा



करूं नको. अनंत गुणी, अनंत रूपी, अशा भगवान विष्णूंना सोडून तूं कां हें ध्यान पतकरतेस? अग स्मशानांत तुझ्यासारखी रूपसुंदरी नाजुक कळी करपून जाइल. इथं काय, स्वर्गांत अनंत अप्सरा तुझ्या सेवेला आणि मनरंजनाला असतील! तुला हातांतल्या कमलासारखी ठेवतील भगवान! आलेलं अमृत सोडून ती संन्याशाची भांग कशाला पाहिजे झाली आहे तुला?'

'सांगतें कशाला पाहिजे झाली आहे ती! सांगतें तुला त अमृत आहे का भांग आहे ती! आणि तसली भांगच मला कां आवडली तेंहि ऐक!'

तूं म्हणतेस विष्णु सुंदर आहेत. खरं आहे. पण मला तसल्या नाजुक सौंदर्यापेक्षां माझ्या देवाचं मर्दानी स्वरूपच जास्ती आवडतं!

तूं म्हणतेस विष्णु रत्नजडित किरीट धारण करतात. पण मला तसल्या कृत्रिम मुकुटापेक्षां सहज व साधा घनदाट केशकलापाचा जटामुकुटच अत्यंत सुंदर वाटतो.

सुंदर नाजुक दातांच्या आणि गोंडस जिवणीच्या श्रीविष्णु-पेक्षां दुष्टावर दांत खाणारा आणि विश्वासघातक्यांना दाढेखालीं रगडणारा महारुद्रच श्रेष्ठ नाहीं काय?

विष्णूंच्या गळ्यांत म्हणे रत्नांचे हार आणि कौस्तुभांच्या माळा आहेत. कशाला हव्यात त्या दगडांच्या माळा? जड वस्तूंच्या माळा शोभेसाठीं त्यांच्या त्यांनाच लखलाभ असोत.

पण माझे शंकर तशा माळा घालत नाहींत. तर विद्वान् लोकांच्या शिरकमलांची माळ याचा अर्थ विद्वत्तेचें–साक्षात् सरस्वतीचें–स्थान अशा नरमस्तकाची माळ माझे परमेश्वर गळ्यांत घालतात ! आणि त्या विद्वानांनाहि सर्व विद्या व कलांचा दाता नव्हे तर जन्मदाता भगवान् श्रीशंकर यांच्या गळ्यांतील कंठमणी म्हणवून घेण्यांत जन्माचं सार्थक वाटतं. यांत तुला कमीपणा कुसला दिसला ?

तुझे भगवान् श्रीवत्सलांछन भूषण म्हणून मिरवीत असतील ! मिरवूं दे त्यांना ! पण असल्या मदोन्मत्त ब्राह्मणाची लाथ भूषण म्हणून मिरवण्यापेक्षां मदोन्मत्तांना आपल्या तांडव नृत्यानें पायाखालीं तुडवण्यांतच खरा पुरुषार्थ आहे असं मला वाटतं ! म्हणूनच तर शंकर मला जास्त आवडतात !

तुझ्या विष्णूंचे डोळे; म्हणे " उमलती कमळं !" करायचा काय आहेत तीं ? कुणीहि यावं नी खुडून न्यावं ? ज्याच्या डोळ्यांतून आगीच्या ठिणग्या बाहेर पडतात त्याच्याकडे वांकडा डोळा करून बघण्याची प्राज्ञा आहे का कोणाची ! ज्यांनीं आपल्या डोळ्याच्या धाकांत त्रिभुवन ठेवलं आहे ते शंकरच मला प्रिय आहेत !

म्हणे "चतुर्भुज विष्णु आणि दशभुज शंकर !" खरं आहे तुझं म्हणणं ! त्यांतच मोठेपणा सिद्ध होतो शंकराचा ! दशभुजा याचा अर्थच असा कीं, शिवाच्या–शंकराच्या भुजा दशदिशांत पसरलेल्या आहेत. ऐंशी कोटी भुजा आहेत त्यांना ! त्यांचं

नुकसान, त्यांचा पराभव कोणीहि करणं शक्य नाहीं! म्हणतात ना? "सत्यं, शिवं, सुंदरं." म्हणजे "जें सत्य आहे तें शिव आहे, जें शिव आहे तें सुंदर आहे. आणि जें सत्य आहे त्याचा पराभव कोणी करूं शकत नाहीं; म्हणून माझे शिव अजिंक्य आहेत. त्यांना सोडून कोणाला वरूं?

माझ्या शंकरांना म्हणूनच पिवळ्या पीतांबराची गरज नाहीं! क्रूर वाघाचं आणि उत्तम हत्तीचं कातडं सोलून नेसणाराच पराक्रमी पति पाहिजे मला!

गरुडावर बसून आकाशांत भराऱ्या मारणाऱ्या आणि दुरून जगाकडं बघून तें सांभाळल्याच्या समाधानावर जगणाऱ्या विष्णूचा तूं अभिमान बाळग! पण मला म्हाताऱ्या बैलावर विश्वासून राहून जगाचं पोषण करायला कारण होणाऱ्या नंदी वाहनाचाच अधिक अभिमान वाटतो!

तुला विष्णुचा शेषशायी म्हणून अभिमान वाटतो. पण मी म्हणतें दुष्टावर विश्वास ठेवून झोपीं जायचं नी मग त्याचा दुष्टपणा कळला म्हणजे त्याला मारण्यासाठीं कालियामर्दनासारखे प्रसंग आणायचे, यांत काय शहाणपणा आहे? त्यापेक्षां त्यांना अंगाखांद्यावरच ठेवायचं आणि आपल्या म्हणण्याप्रमाणं डोलवायला लावायचं हेंच शहाणपणाचं चिन्ह आहे!

म्हणे गंधर्वांच्या गाण्यांत गुंग होतात विष्णु! त्यांत काय अवघड आहे? भुतांच्या किंचाळण्याला साथ देऊन स्मशानांत

स्वर्ग-कैलास-निर्माण करण्यांतच जगाचं कल्याण आहे! जगांत नवीन संगीत निर्माण करण्यांतच खरा पुरुषार्थ आहे!

मनकामना पूर्ण करणाऱ्या विष्णुपेक्षां कामदेवाचंच दहन करणारे श्रीशंकर अधिक कल्याणकारक नाहीं काय?

मला वाटतं तुझ्या सगळ्या प्रश्नांचीं उत्तरं दिलीं मी! आणि शेवटीं तुला सांगतें, ते त्यागी आहेत, ते संन्यासी आहेत, आणि इतके शक्तिमान् असे शंकर-स्मशानांत देखील राहायला तयार असणारे, विरक्त शंकर! म्हणूनच मला प्रिय आहेत. मी त्यांच्याशींच करणार लग्न! माझ्यासारख्या तपस्वी आणि रुक्ष मुलीला शंकरच योग्य आहेत. माझ्या वृत्तीला आणि बुद्धीला तिथेंच शांतता मिळेल. म्हणून मी हा निश्चय केला आहे.

तुला जर मदत करावयाची नसेल तर मला तसं सांग. मी माझा प्राणत्याग करते.'

बाकीच्या मुलींहि तोपर्यंत आल्या होत्या व त्या गप्प बसल्या होत्या. त्या म्हणाल्या 'छे छे! पार्वती असं नाहीं करायचं. चल तूं म्हणतेस त्याप्रमाणं करूं या.'

सखी पण म्हणाली 'पार्वती, आम्हांला नव्हतं ठाऊक हें सगळं, बरं झालं तूं सांगितलंस म्हणून!'

पार्वती म्हणाली, 'अग माहीत काय व्हायचं? शिव नू विष्णु दोघेहि एकमेकांचे भक्त आहेत. दोघेही एकमेकांची पूजा करतात! तूं विचारलंस म्हणून तुझींच बोटं तुझ्याच घशांत

घालण्यासाठीं मी इतका वाद केला, असो. मला शिव प्रिय आहेत, मी त्यांच्याशींच लग्न करणार आहे हें निश्चित!'

'पण त्याला काय करूं या तें सांग ना,' सखी म्हणाली.

मुली म्हणाल्या, 'चला आपण हिला घेऊन वनांतच जाऊं या! आणि तिथं मोठं अनुष्ठान करून श्रीशंकरांनाच बोलावणं करूं या! म्हणजे त्यांना तें कळेल, आणि ते येतील. मग आपण आपला हेतु त्यांना सांगूं म्हणजे ते पार्वतीला वरतील. तिच्याशीं लग्न करतील आणि तिला घेऊन जातील!'

'बरं तसंच करूं या. चल पार्वती,' सखी म्हणाली.

त्या सगळ्या मिळून फिरण्याच्या निमित्तानें बाहेर पडल्या. गांवाबाहेर आल्या. त्या जरी डोंगराळ मुलखांतच राहणाऱ्या मुली होत्या तरीहि ती रात्रीची वेळ होती व त्या वेळीं बाहेर पडणं धोक्याचंच होतं! पण दृढनिश्चयापुढं कसलंहि संकट आणि कसलाहि धोका टिकत नाहीं. त्या बाहेर पडल्या. इतक्यांत सोसाट्याचा वारा सुटला. मुसळधार पाऊस कोसळत होता. विजांचा गडगडाट होऊं लागला. चिखल मावेनासा झाला. रात्रीची वेळ; श्रावण भाद्रपदांतला अंधार! कांहीं दिसेना! ठेचा खात एकीमेकींना सावरीत त्या निघाल्या होत्या. पाठीमागून कोणी शोधण्यास येतील ही एक भीति! त्या सर्वजणींचे इतके हाल झाले कीं, त्यांची कल्पनाच केलेली बरी!

आतां तिला आईवडिलांची आठवण होऊं लागली. आपण वडिलांच्या दुःखाला कारण झालों. अपमानाला कारण झालों.

असं म्हणून तिला रडूं कोसळलं; त्या मोठ्या कष्टानं मार्ग काढीत होत्या. किर्र झाडी, निबिड अंधार, दुर्गम वाट, त्यापुढं जाणंच कठीण म्हणून एका झाडाखालीं बसल्या. प्रथम कांहींच कळेना. अधून मधून वीज होई, थोडासा प्रकाश मिळे. त्यांतून थोडं पाहून घेतलं. तेव्हां त्यांना कळून आलं कीं, हें एक मोठं अरण्य आहे. आणि या ठिकाणी वाघ सिंह इत्यादि हिंस्र पशू रहात असावेत. मुली जास्तच घाबरल्या. इतक्यांत वाघाची डरकाळी ऐकूं आली. त्या भिऊन एक-मेकींना चिकटल्या. थोडी भीति कमी झाल्यावर संरक्षणासाठीं व निवाऱ्यासाठीं जागा पाहूं लागल्या. तोंच त्यांना एक गुहा दिसली. तिच्या दाराशीं जाऊन बसल्या. पाऊस थोडासा थांबला. दिशा उजळल्या. थोडासा प्रकाश दिसूं लागला. मुलींनीं वल्कलं नेसून स्नान केलं. नदीच्या कांठचा चिखल आणला. त्याचा महादेव केला. त्याच्या शेजारी पार्वतीनं आपली पण मूर्ति तयार करून ठेवली; म्हणजेच आपल्याच जोडीची आपणच पूजा सुरू केली.

कैलास पर्वतावर श्रीशंकर ध्यानस्थ बसले होते. ते समाधि लावूं इच्छित होते. पण ती कांहीं केल्या लागेना! त्यांना वाटूं लागलं मला आज असं कां बरं होतंय, माझी समाधि का लागेना? माझी कोण आठवण तर करीत नाहीं ना? साधी आठवणच असती तर शिंक किंवा उचकी लागली असती फार तर! पण माझं मन कां बेचैन होतंय? काय बरं असेल? असूं दे कांहीं असलं तरी! असं म्हणून ते पुन्हां समाधि लाव-

ण्याचा प्रयत्न करूं लागल. पण कांहीं केल्या लागेना. मनाची फसवणूक तरी किती वेळ करणार ? शेवटीं प्रयत्न सोडून दिला व स्वस्थ बसून राहिले. तरीहि चैन पडेना. शेवटीं बसलेलं सिंहासन हादरतंय असं वाटूं लागलं! नंतर त्यांनीं अंतरज्ञानानं पाहिलं तर त्यांना कळून आलं कीं, एक कुमारिका आपल्या दर्शनासाठीं ध्यास घेऊन बसली आहे! ते उठले व तिकडे जाण्यास निघाले. या वनांत आले, व येऊन पहातात तर शिव-पार्वतीची पूजा केली आहे. वर अनेक पत्री व वनफुलं घातलीं आहेत, गोड अशा वनफळांचा नैवेद्य दाखवला आहे, आणि त्या तपानं आणि उपासानं व्याकूळ होऊन निश्चेष्ट पडल्या आहेत! त्यांना सावध केलं आणि विचारलं कीं, 'तुम्ही माझी आठवण कां केली ?'

मुलींनीं उठून नमस्कार केला. सखी हात जोडून म्हणाली,

'देवाधिदेवा महादेवा, कैलासनाथा श्रीशंकरा, माझी मैत्रीण पार्वती हिनं आपल्याला मनानं वरलं आहे. ती दुसऱ्याशीं विवाह करणार नाहीं. तिचे पिते हिमवान् तिला श्रीविष्णूंना देऊं इच्छितात; म्हणून ती आत्मत्याग करूं इच्छित होती. तीच आतां आपलेकडे आली असून आपलेंच ध्यान धरून बसली आहे आणि पार्वती-परमेश्वराची पूजा करीत आहे. तरी तिच्यावर कृपा करावी. तिला आपल्या पदरांत घ्यावें. आपल्या पत्नीपदावर विराजमान करून तिला धन्य करावें. इतकीच प्रार्थना !'

हें ऐकून श्रीशंकर म्हणाले,

' पार्वती, ऊठ, मी प्रसन्न आहें. तुझ्या इच्छेप्रमाणें होईल.'

पार्वतीला व सर्व मुलींना अत्यंत आनंद झाला. नंतर सर्व मुलींनीं त्यांना बसवून त्यांची पूजा आरंभिली.

हा प्रकार इकडे चालला असतांना तिकडे घराकडे वेगळाच प्रकार चालू झाला होता. मुलींचा कोठें पत्ताच नाहीं! बाहेर गेलेल्या घरीं आल्याच नाहींत! म्हणून चोहीकडे शोधाशोध सुरू झाली. मुली कांहीं सांपडेनात! हें सगळीकडं कळलं. वनांत गेलेल्या सगळ्या मुलींच्या घरांतून रडारडी सुरू झाली. राजकन्या हमवतीचा पत्ता न लागल्यामुळें . सगळा हिमालय काळजींत पडला. ही बातमी हां हां म्हणतां चोहींकडे पसरली. आईने तर हंबरडाच फोडला. आईबाप दोघंही बेशुद्ध पडली. अखेर प्रधान वगैरे मंडळींनी शुद्धीवर आणून आणखी शोध करण्याचें ठरविलें व रानांवनांतून व निबिड अरण्यांतून माणसं पाठवलीं. बाप हिमवान् म्हणाला, मी पण शोधायला जातों. तो निघणार इतक्यांत मुली वनांत असून शिवपूजा करीत असल्याची बातमी आली. तो तसाच निघाला. वनांत आला. मुलींचं पारणं चाललं होतं. तिथं येऊन पोहोंचला. त्यानं हैमवतीला पोटाशीं धरलं. त्याच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा गळूं लागल्या. बाकीच्या मुलींच्या पित्यांचीहि तीच अवस्था झाली. पहिला भर ओसरला. मुलींना विचारलं 'तुम्ही अशा निर्जन अरण्यांत कां आलांत? असलं कसलं संकट तुमच्यावर आलं म्हणून तुम्ही अरण्यवास स्वीकारला? राजकुमारीचं

तर लग्न ठरलं आहे श्रीविष्णुशीं ! अन् तुम्हीं इकडे आलांत ? गांवांत कोण आनंदोत्सव चाललेला ! पण तुमच्या नाहींशा होण्यानं सगळं गांव दुःखानं बुडून गेलं ! असं कां केलंत हें ? '

सखी म्हणाली, 'महाराज, जें तुमच्या आनंदाचं कारण आहे तेंच आमच्या दुःखाचं कारण आहे. म्हणून आम्ही आलों. देवी पार्वतीची इच्छा श्रीविष्णूशीं लग्न करण्याची नाहीं ! तिच्या सांगण्यावरून आम्हांला इकडं येणं भाग पडलं; नाहीं तर तिनं जीव दिला असता.'

असं म्हणून सर्व हकीकत सांगितली. ती ऐकून हिमवान् म्हणाला;

' बाळे, चल. मी तुझ्या मनाप्रमाणेंच करतों. नाहीं देत श्रीविष्णूंना ! नारद ऋषींनीं जरी सांगितलं असलं तरी क्षमा मागतों त्यांची आणि माझ्या बाळीच्या करतों मनासारखं ! श्रीकैलासनाथ शंकराच्या बरोबरच विवाह करूं या पार्वतीचा. चल बरं आतां घरीं ! '

असं म्हणताहेत तोंच नारदऋषि आले. त्यांचं अगत्यपूर्वक स्वागत केलं. त्यांना उच्चासनावर बसवून हात जोडून कुशल विचारलं. तेव्हां त्यांनीं सांगितलं,

' नगराज, मी मुळींच सांगितलं नाहीं श्रीविष्णूंना ! पार्वतीचं मन मला माहीत होतं, पण तें खरं कितपत आहे, हें पहायचं होतं, म्हणून मी हें केलं. पण त्याचा परिणाम इतका

होईल असं नाहीं वाटलं! चला आतां जामातीना बोलावून लग्न सोहळा साजरा करा, म्हणजे झालं!'

'हो पाठवतोंच बोलावणं. इथंच करू या सगळं!'

'हं म्हणजे येतात त्या पर्वतावरच्या पहाडी भुतांचा मेळा आणि नंदीवाहन, अंगाला राख फासून! तें वाघाचं कातडं, वाढलेली जटा आणि दाढी, काय पण नवरा तरी शोधला पार्वतीनं!' नारद म्हणाले.

'हें पहा मुनिराज, त्याहि वेषांत मला ते सुंदरच दिसतात बरं का! मी मनानं वरलं आहे त्यांना! जुलमानं नाहीं!' पार्वती म्हणाली.

लग्नाची तयारी झाली. कैलासाहून श्रीशंकर आपल्या शृंगी भृंगी परिवारासहं आले. लग्नसोहळा मोठ्या आनंदानं पार पडला. नंतर शंकर म्हणाले,

'पार्वती, हें सर्व घडून येण्याला ह्या तुझ्या सख्याच कारण झाल्या, नाहीं तर तूं जीव देऊन मोकळी झाली असतीस होय ना?'

'तें मला नाहीं माहित! सखीलाच विचारा. मला तिनं किती त्रास दिला, माझ्याशीं किती वाद केला तें! मोठी वाईट सखी!' पार्वती तोंड लपवून म्हणाली.

'होय बाई, खरं आहे! आतां सखी "मोठी वाईट" असायचीच! कारण श्रीशंकर आहेत ना तुझ्या पुढं? मग जगांत कोण चांगलं दिसणार आहे तुला त्यांच्याशिवाय? जातों आम्ही! उगीच आमची अडचण नको तुला!'

'हें पहा, बसा तुम्हीं! तुमचं मत्रिणींचं भांडण मला कळतं आहे! तुमचं कांहीं असो! आमच्या या लग्नाला—आमच्या या मीलनाला कारण तुम्ही आहांत हें मी विसरणार नाहीं! इतकंच नाहीं तर दुसऱ्यांनींहि तें विसरूं नये अशी माझी इच्छा आहे. म्हणून मी सर्व विवाहेच्छु मुलींना असा वर देऊन ठेवतों कीं, जर त्यांना मनासारखा-मनांत ठरवलेला नवरा हवा असेल तर त्यांनीं आमच्या या मीलन दिवशीं माझी तुमच्यासह पार्वतीची पूजा मनोभावें करावी. आजचा हा दिवस जसा पार्वतीनं व्रतस्थ रीतीनं घालवला तसा घालवावा व मद्-तीस येण्याची प्रार्थना करावी. मी अवश्य येईन आणि त्यांच्या कार्यांत मदत करीन. भाद्रपद शु॥ ३ या दिवशीं तुमच्यासह माझी पूजा केल्यास मी प्रसन्न होईन. या व्रताला म्हणूनच "हरितालिका" असं मी नांव देतों. मग तर झालं ना? मग तरी तुमच्या मैत्रीची आठवण सगळ्यांना होईल ना?

'होय भगवन्!'

अशा रीतीनं पार्वतीपरमेश्वराचं मीलन झालं!

ऐकलीत ना गोष्ट? पाहिलंत ना किती धाडस, किती साहस, किती दृढनिश्चय आहे तिचा?

नाहींतर नुसतं मुळु मुळु रडायचं आणि मानेवर ठेवतील तें जूं ठेऊन घ्यायचं याला काय शहाणपण म्हणतात? मनालाहि ताप आणि जनालाहि ताप, असलं अर्धवट वागणं काय कामाचं, अशा एका दृढनिश्चयी मुलीची कथा आहे ही. ती न ऐकतां न

समजावून घेतां, उगीच आंधळ्यासारखा आईनं सांगितलं म्हणून मी उपास केला आणि कथेंत काय ऐकायचं म्हणून हळूच झुकांडी दिली! याला काय अर्थ आहे? अशा करण्याला शुद्ध पोरकटपणाशिवाय दुसरं काय नांव द्यायचं?" बाई म्हणाल्या.

"आम्हांला माहीत नव्हतं बाई, ती गोष्ट इतकी चांगली आहे म्हणून!"

"तें माहीत करून घ्यायचं असतं!"

"कोणतीहि गोष्ट पूर्णपणें समजावून घेतल्याशिवाय कसा कळल तिचा बरेवाईटपणा? समजून घ्या अगोदर" "ठं ठं ठं ठं ठं ठंण्" "हं चला आतां झाली घंटा. काय डेझी, गुलशन, तुम्हांला कशी काय वाटली गोष्ट?" "सुंदर आहे बाई!" "यापुढं सगळ्या गोष्टी वाचूं बाई आम्हीं!"

१२४५७

IRBK-0112454

# बालमित्र माला

आमचे सण

१ तिळगूळ घ्या गोड बोला
२ महाशिवरात्र
३ होळी
४ सोन्याचा दसरा
५ नाग पंचमी
६ वसंत गौरी
७ राखी पुनव
८ हरितालिका
९ मंगलमूर्ति
१० नाताळ
११ सती सावित्री

इतर

१ राया अथवा बाल मूर्तिकार
२ गुलाबकळी
३ फुलराणी

★

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर